# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २४१/२०२४ दिनांक:- २६/०६/२०२४.

## “दिनांक २६ जून-जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे आयोजित ‘प्रबोध’ या पहिल्या आंतर-महाविदयालयीन स्पर्धेचा शुभारंभ”

आज दिनांक २६ जून या जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त मिरा-भाईंदरट वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये शाळा, महाविदयालयांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांच्या अभिनव कल्पनेतून महाविदयालयीन विदयार्थ्यांचा या मोहिमेत सक्रिय सहभाग असावा याकरिता आयुक्तालयातील महाविदयालयांमध्ये आंतर महाविदयालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे असे त्यांनी सूचवले. त्याअन्वये आज रोजी मिरारोड येथील एल.आर. तिवारी पदवी महाविदयालय, मिरारोड पुर्व येथे मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील एकुण ११ नामांकित महाविदयालयांची निवड करून सदर आंतर महाविदयालयीन स्पर्धेचे ‘प्रबोध’ असे नामकरण करुन त्याचा उद्घाटन समारंभ आज रोजी पोलीस आयुक्त श्री. मधूकर पाण्डेय यांचे हस्ते संपन्न झाला आहे. सदरवेळी त्यांनी उपस्थित सर्व विदयार्थ्यांना अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन केले तसेच अमली पदार्थ खरेदी, विक्रि, साठा याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास पोलीस आयुक्तालयाचा व्हॉटसअॅप क्रमांक ०८६५५८६५१४१ यावर तात्काळ कळविण्याबाबत आव्हान केले. माहिती देणा-याचे नावाची गोपनियता पाळण्यात येईल असे यावेळी पोलीस आयुक्तांनी सांगितले.

निवडलेल्या एकुण ११ महाविदयालयांच्या अंतर्गत रांगोळी स्पर्धा, पोस्टर मेकिंग स्पर्धा, रिल्स बनवण्याची स्पर्ध, एक पात्री नाटक व सांघिक नृत्य अशा एकुण पाच प्रकारच्या स्पर्धा विदयार्थ्यांसाठी तसेच सर्वोत्कृष्ट उत्सव, सर्वात नावीन्यपूर्ण कल्पना इत्यादी विषयांवरील स्पर्धांचे आयोजन त्या-त्या महाविदयालयांमध्ये करण्यात येणार असून त्यातून प्रथम आलेल्या सर्व विदयार्थ्यांची आंतर महाविदयालयीन स्पर्धा- ‘प्रबोध’ ची अंतिम फेरी दि. ०५/०७/२०२४ रोजी लता मंगेशकर नाटयगृह, मिरारोड पुर्व येथे पार पडणार आहे.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयात हे नेहेमीच युवा पिढीच्या सक्रिय सहभागासह जनजागृतीचे विविध उपक्रम राबवित असतात. आजच्या ‘प्रबोध’ कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभास मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय, अपर पोलीस आयुक्त श्री. श्रीकांत पाठक, पोलीस उप आयुक्त श्री. प्रकाश गायकवाड, राहुल एज्यूकेशन ग्रूपचे सेक्रेटरी श्री. राहुल तिवारी, उपाध्यक्ष श्रीमती कृष्णा तिवारी व निवडक ११ महाविदयालयांचे प्राचार्य तसेच एकुण ५०० विदयार्थी उपस्थित होते.

श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक,अंमली पदार्थ विरोधी कक्ष, श्रीमती तेजश्री शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक, भरोसा सेल यांनी मा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केले होते.

---------


MIRA-BHAYANDAR, VASAI-VIRAR
POLICE COMMISSIONERATE
INTERNATIONAL DAY AGAINST DRUG ABUSE
Prabodh


MIRA-BHAYANDAR, VASAI-VIRAR
POLICE COMMISSIONERATE
STOP
SAY NO TO DRUGS
STOP




SAY NO TO DRUGS
DRUG KILLS STAY AWAY

----------oooooo-----------